# लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालय, यवतमाळ

## संगीत विभाग

## पर्यायवाचक प्रश्नसंच

**बी. ए. भाग-१ (सत्र-१)** **प्रा. डॉ. चंद्रशेखर कुडमेथे**

१) तालाच्या पहिल्या मात्रेला <u>सम</u> असे म्हणतात.

२) सात स्वरांच्या क्रमवार समुहाला <u>सप्तक</u> असे म्हणतात.

३) त्रितालाच्या मात्रा संख्या <u>१६</u> आहेत.

४) <u>पं. विष्णू नारायण भातखंडे</u> यांना चतुरपंडीत नांवाने ओळखतात.

५) राग भूपाली चा वादी-संवादी <u>ग-ध</u> हे स्वर आहेत.

६) संगीतज्ञांच्या मते श्रुतींची एकूण संख्या <u>२२</u> आहे.

७) दादरा तालाच्या मात्रा संख्या <u>६</u> आहेत.

८) तानपुरा या वाद्याला <u>४</u> तारा असतात.

९) पं. पलुस्कर यांचे गुरू <u>पं. इचलकरंजीकर</u> होते.

१०) आपल्या नियत श्रुतींपेक्षा कमी उंचीवर लागणाऱ्या स्वरास <u>कोमल स्वर</u> म्हणतात.

११) तानसेन यांच्या गुरूचे नाव <u>स्वामी हरिदास</u> होते.

१२) लक्षसंगीत हा ग्रंथ <u>पं. भातखंडे</u> यांनी लिहीला.

१३) समेपासून समेपर्यंतच्या अंतराव <u>आवर्तन</u> असे म्हणतात.

१४) अग्नी आणि  वायू यांच्या संयोगाने उत्पन्न होणाऱ्या ध्वनीला <u>नाद</u> असे म्हणतात.

१५) रागवाचक स्वर समुदाय म्हणजे <u>पकड</u> होय.

१६) अल्हैया बिलावल रागामध्ये <u>कोमल निषाद</u> हा स्वर विवादी स्वर या नात्याने येतो.

१७) कल्याण थाटातील रागांचा गानसमय प्रामुख्याने रात्रीचा प्रथम प्रहर असतो.

१८) लाहोर येथे गांधर्व महाविद्यालयाची स्थापना <u>पं. पलुस्कर</u> यांनी केली.

१९) तानसेन यांच जन्म ग्वाल्हेरमधील <u>बेहट</u> गावी झाला.

२०) तानसेन यांचा जन्म <u>१९३२</u> साली झाला.

२१) तानसेन यांचे मुळ नाव <u>तन्ना मिश्र मकरंद पांडे</u> होते.

२२) <u>रबाब</u> नावाचे वाद्य तानसेन यांनी शोधून काढले.

२३) संगीतसार आणि रागमाला हे ग्रंथ तानसेन यांनी लिहीले.

२४) <u>अभिनव रागमंजिरी</u> हा ग्रंथ पं. भातखंडे यांनी लिहीला.

२५) <u>'मॉरिस कॉलेज ऑफ म्युझिक'</u> ही संगीत संस्था लखनौ येथे पं. भातखंडे यांनी स्थापन केली.

२६) ‘Historical Survey of Indian Mussic’ हा ग्रंथ पं. भातखंडे यांनी लिहीला.

२७) १० थाटाची अभिनव पद्धत पं. भातखंडे यांनी निर्माण केली.

२८) ग्वाल्हेर येथे माधव संगीत विद्यालयाची स्थापना पं. भातखंडे यांनी केली.

२९) ‘संगीत कलानिधी’ ही उपाधी पं. भातखंडे यांना मिळाली.

३०) पं. भातखंडे यांचा जन्म १० ऑगस्ट १८६० रोजी मुंबई येथील वाळकेश्वर येथे झाला.

३१) एका नादापासून स्पष्टपणे वेगळा असा ऐकू येणारा नाद म्हणजे श्रृती होय.

३२) अर्धवर्तुळाकार भोपळ्याच्या मोकळ्या तोंडावर पातळ असे वर्तुळाकार लाकडी आच्छादनाला तबली असे म्हणतात.

३३) तंबोऱ्याच्या भोपळ्याच्या बुडाशी अडीच इंच लांब व अर्धा इंच रूंद पट्टी असते, तीला तारपट्टी म्हणतात.

३४) तानपुऱ्याच्या तारा क्रमाने प सा सा सा अशा स्वराने लावतात.

३५) हार्मोनियम मधील  चौकोनी पेटीच्या आकाराच्या लाकडी खोक्याला कॅबीनेट असे म्हणतात.

३६) हार्मोनियम हे वाद्य सुशिर वाद्य गटात मोडते.

३७) मध्यम व निषाद वर्ज्य असलेला अभ्यासक्रमातील राग भूपाली आहे.

३८) भूपाली रागाचे वादी-संवादी –ग–ध हे स्वर आहेत.

३९) यमन रागामध्ये तीव्र मध्यमाचा उपयोग होतो.

४०) कर्नाटक संगीत पद्धतीमध्ये भूपाली रागाचे मोहनम हे नाव आहे.

४१) भूपाली रागाचा समप्रकृतिक राग देशकार आहे.

४२) ज्या गितामध्ये रागाची माहिती दर्शविल्या जाते, त्या गितास लक्षणगीत असे म्हणतात.

४३) अल्हैया बिलावल रागातील विवादी स्वर कोमल निषाद हा आहे.

४४) यमन या रागाची निर्मिती अमीर खुसरो यांनी केली.

४५) बिलावल थाटाचा आश्रय राग अल्हैया बिलावल हा आहे.

४६) पं. पलुस्कर यांचे मुळ आडनांव गाडगीळ हे आहे.

४७) ‘हिंदुस्थानची संगीत पद्धती’ हा ग्रंथ पं. भातखंडे यांनी लिहीला.

४८) हार्मोनियमचा शोध युरोपमधील अलेक्झांडर डिबेन यांनी लावला.

४९) उच्च प्रतीच्या हार्मोनियममध्ये ३९ कीज असतात.

५०) तानपुऱ्यामध्ये चार तारा असतात.

५१) ‘सा रे ग म प ध नि’ हे ७ स्वर शुद्ध स्वर आहेत.

५२) पं. पलुस्कर हे ग्वाल्हेर घराण्याचे गायक होते.

५३) तानसेनची समाधी ग्वाल्हेर येथे आहे.

५४) संगीतातील व्याकरणकार असे पं. विष्णू नारायण भातखंडे यांना संबोधतात.

५५) ताल मोजण्याच्या परिमाणाला मात्रा म्हणतात.

५६) पं. भातखंडे पद्धतीने 'X' या चिन्हाने सम दर्शवितात.

५७) पं. पलुस्कर पद्धतीने '१' या चिन्हाने सम दर्शवितात.

५८) पं. भातखंडे पद्धतीने '०' या चिन्हाने काल दर्शवितात.

५९) पं. पलुस्कर पद्धतीने '+' या चिन्हाने सम दर्शवितात.

६०) भारतीय संगीत क्षेत्रातील 'क्रांतिकारी युगपुरूष' असे पं. विष्णु नारायण भातखंडे यांना म्हटल्या जाते.

६१) अकबराच्या दरबारातील नवरत्नांपैकी एक म्हणून सम्राट तानसेन यांना ओळखले जाते.

६२) तानपुरा मिसळून एका वेळी जास्तीत जास्त ६ शुद्ध स्वर तयार करता येतात.

६३) तानपुऱ्याला 'नादब्रह्म' म्हटले जाते.

६४) भैरव, भूपाली हे गंभीर प्रवृत्तीचे राग आहेत.

६५) दादरा तालामध्ये ६ मात्रा आहेत.

६६) आसावरी थाटामध्ये ग ध नि कोमल असून बाकी स्वर शुद्ध आहेत.

६७) सरगम गीतात शब्द नसतात.

६८) लक्षण गीतामध्ये रागाचे वर्णन असते.

६९) स्वरावर उभी रेषा तीव्र स्वरांचे चिन्ह आहे.

७०) अर्धचंद्र हे चिन्ह एका मात्रेत जास्त स्वर असल्यास देतात.

७१) स्वरावर बिंदू तार सप्तकातील स्वरासाठी चिन्ह दर्शवितात.

७२) भैरव रागात रे ध आंदोलित करतात.

७३) हार्मोनियमला बाजाची पेटी म्हणतात.

७४) हवेच्या सहाय्याने हार्मोनियम वाद्य वाजविले जाते.

७५) गीताच्या दुसऱ्या भागास अंतरा असे म्हणतात.

७६) स्वराच्या उतरत्या क्रमाला अवरोह म्हणतात.

७७) दोन मात्रेतील समान अंतराला लय म्हणतात.

७८) ज्या स्वरांची स्थानं बदलाल त्या चल स्वर म्हणतात.

७९) लयीचे मुख्य तीन प्रकार आहेत.

८०) संगीतात वेळ मोजण्याच्या साधनास ताल म्हणतात.

८१) गायन, वादन, नृत्य या तीनही कलांच्या समुहास संगीत असे म्हणतात.